**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**गुरुवार दिनांक २२ मे २०२५**

**ठळक बातम्या**

1. **राज्यातल्या १५ रेल्वे स्थानकांसह देशभरातल्या १०३ अमृत रेल्वे स्थानकांचं प्रधानमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन, नागपूरच्या इतवारी जंक्शन स्थानकाचा समावेश.**
2. **ऑपरेशन सिंदूरबाबत भारताची भूमिका मांडण्यासाठी खासदार श्रीकांत शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाची संयुक्त अरब अमिरातीच्या मंत्र्यांशी चर्चा.**
3. **पावसाळ्यात जीवीत आणि मालमत्तेची हानी रोखण्यासाठी राज्यातल्या सर्व प्रशासकीय अधिकाऱ्यांनी सुटीच्या दिवसांसह २४ तास सज्ज राहावं, असे मुख्यमंत्र्यांचे निर्देश.**
4. **विदर्भात आज, उद्या आणि परवा पावसाचा अंदाज.**

---

**अमृत रेल्वे स्थानक**

**प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज राजस्थानमध्ये बिकानेर इथून दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून देशातल्या १८ राज्यांमधल्या १०३ अमृत रेल्वे स्थानकांचं उदघाटन केलं. यात महाराष्ट्रातल्या १५ रेल्वे स्थानकांचा समावेश असून विदर्भातल्या नागपुरातील नेताजी सुभास्चंद्र बोस इतवारी रेल्वे स्टेशन, गोंदिया जिल्ह्यातील आमगाव, चंद्रपूर जिल्ह्यातील चांदा फोर्ट, अकोला जिल्ह्यातील मुर्तीजापुर यांचा समावेश आहे. या कार्यक्रमात सर्वप्रथम प्रधानमंत्री मोदी यांनी या कार्यक्रमात बिकानेर-मुंबई एक्सप्रेस गाडीला हिरवा झेंडा दाखवला. देशात रेल्वेचे जाळे मजबूत केले जात असल्याचे त्यांनी सांगितले -**

***(होल्ड बाईट - पंतप्रधान नरेंद्र मोदी -२६ सेकंद)***

***अभी देश में करीब 70 रूट पर वंदे भारत ट्रेन चल रही है। इससे दूर सुदूर के इलाकों में भी आधुनिक रेल पहुंची है। बीते 11 साल में सैकड़ों रोड, ओवर ब्रिज, और रोड अंडर ब्रिज का निर्माण किया गया है, 34 हजार किलोमीटर से ज्यादा के नए रेल ट्रैक बिछाये गए हैं।***

प्रधानमंत्री मोदी यांनी सुमारे २६ हजार कोटी रुपये खर्चाच्या विकास प्रकल्पांची पायाभरणी, उद्घाटन आणि लोकार्पण केलं. अमृत भारत स्टेशन योजने अंतर्गत देशातल्या १३०० पेक्षा जास्त रेल्वे स्थानकांचा पुनर्विकास केला जात आहे. या स्थानकांमध्ये स्थानिक वास्तुकलेचं प्रतिबिंब दिसेल तसंच दिव्यांगजनांसाठी आणि सर्वसामान्य नागरिकांना अत्याधुनिक सुविधा उपलब्ध केल्या जातील. या कार्यक्रमात मुंबईतून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस देखील सहभागी झाले होते. त्यांनी रेल्वे स्थानक पुनर्विकास कार्यक्रमाची प्रसंशा केली -

*(होल्ड बाईट - फडणवीस ३० सेकंद)*

*एकाच वेळी देशातले एक हजार रेल्वेस्टेशन पुनर्विकसित करून रेल्वे स्टेशन वर आधुनिक सोयी देणं आणि मोठे रेल्वे स्टेशन एअरपोर्टसारखे सुंदर आणि सुसज्जीत बनवनं अशा प्रकारचा एक कार्यक्रम हाती घेण्यात आला होता. याअंतर्गत महाराष्ट्रातही 100 पेक्षा जास्त स्टेशन्स पुनर्विकसित होत आहे. त्यातल्या 15 स्टेशनचं पुनर्विकासाचं काम पूर्ण झाल्यामुळे आज त्याचं लोकार्पण झालं आहे.*

दरम्यान, नागपूरच्या दक्षिण मध्य पूर्व रेल्वे च्या नेताजी सुभाष चंद्र बोस ईतवारी स्टेशनच्या पुनःविकासाच्या उद्घाटना करिता पूर्व नागपूरचे आमदार कृष्णा खोपडे, तसेच माजी राज्यसभा खासदार डॉ. विकास महात्मे, रेल्वेचे विभागीय महाव्यवस्थापक दीपक कुमार गुप्ता यांची उपस्थिती होती. याप्रसंगी उपस्थितांना संबोधित करताना पूर्व नागपूरचे आमदार कृष्णा खोपडे यांनी सांगितलं की इंग्रजांच्या काळापासून या स्थानकाला इतवारी रेल्वे स्टेशन असेच म्हणत होते. नागपूरचे महापौर दया शंकर तिवारी यांनी या स्थानकाला नेताजी सुभाषचंद्र बोस यांचे नाव मिळावे म्हणून प्रयत्न केले होते 1940 साली नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या फॉरवर्ड ब्लॉक या पक्षाचे अधिवेशन नागपुरात भरले होते याचीच आठवण म्हणून या स्थानकला नेताजी सुभाषचंद्र बोस यांचे नाव देण्यात आल्याचं कृष्णा खोपडे यांनी स्पष्ट केलं. इतवारी स्थानकावर आता दिव्यांग अनुकूल सोयी सुविधा राहणार असून रेल कोच रेस्टॉरंट, आरामदायक आसन सुविधा, अद्ययावत शौचालय, मोबाईल चार्जिंग पॉइंट, एलईडी सूचनाफलक, डिजिटल तिकीट विक्री काउंटर, प्रधानमंत्री जन औषधि केंद्र अशा सोयीसुविधांचा समावेश असेल. अकोल्यातील मुर्तिजापूर येथे उद्घाटन सोहळ्याला खासदार अनुप धोत्रे आमदार हरीश पिंपळे यांच्यासहइतर मान्यवर उपस्थित होते. अमृत भारत योजनेच्या माध्यमातून मूर्तिजापूर रेल्वे स्टेशनचा कायापालट झाला असून अत्याधुनिक सोयी

सुविधा, दिव्यांगासाठी विशेष व्यवस्थेसह प्रवाशाच्या सुरक्षेला प्राधान्य देण्यात आले आहे. चांदा फोर्ट इथं  विशेष लोकार्पण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्याला खासदार प्रतिभा धानोरकर, आमदार किशोर जोरगेवार, बिलासपूरचे सीई बी.व्ही.एस. सुब्रमण्यम, स्थानिक नागरिक व प्रवासी प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.चांदा फोर्ट स्थानकात चांदाफोर्टच्या ऐतिहासिक स्थापत्यशैलीत, 'खुर्दा पॅटर्न'नुसार पारंपरिक प्रवेशद्वार, लिफ्ट व एस्केलेटर (दुसऱ्या टप्प्यात) - सुलभ प्रवासासाठी, कोळसा उद्योग व गोंड संस्कृतीवर आधारित भित्तीचित्रे व सजावट, फ्लॅग माउंट , 12 CCTV कॅमेऱ्यांद्वारे वाढवलेली सुरक्षा व्यवस्था, 'वन स्टेशन वन प्रॉडक्ट' योजना - स्थानिक उत्पादकांना प्रोत्साहन या सुविधा प्रदान करण्यात आल्या आहेत.

-----------------------------------

बहुपक्षीय प्रतिनिधिमंडल

दहशतवादाविरोधात भारताची भूमिका स्पष्ट करण्यासाठी ऑपरेशन सिंदूर अंतर्गत, सात बहुपक्षीय प्रतिनिधिमंडळं  येत्या १५ दिवसांत ३२ वेगवेगळ्या देशांना भेट देणार आहेत. खासदार श्रीकांत शिंदे यांच्या नेतृत्वाखालचं  शिष्टमंडळ  आज सकाळी संयुक्त अरब अमिरात इथं पोहोचलं. युएईच्या फेडरल नॅशनल कौन्सिलचे सदस्य अहमद मीर खुरी आणि युएईमधले भारतीय राजदूत संजय सुधीर यांनी या शिष्टमंडळाचं स्वागत केलं. ऑपरेशन सिंदूरचा भाग म्हणून अशा प्रकारचं आयोजन करणारा युएई हा पहिलाच देश असून,  यूएई चे सहिष्णुता आणि सहअस्तित्व  मंत्री  शेख नाहयान बिन मुबारक अल नाहयान यांच्यासोबत या शिष्टमंडळाची  उच्चस्तरीय बैठक झाली.

-----------------------------------

राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण

राष्ट्रीय नमुना सर्वेक्षणाला 75 वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त, राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालय, सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालय, भारत सरकारच्या राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांतर्फे  उद्या 23 मे शुक्रवारी रोजी सकाळी 10.00 वाजता सीजीओ कॉम्प्लेक्स, सेमिनरी हिल्स, नागपूर येथे एक बाईक रॅली आयोजित केली जाणार आहे. या रॅलीमध्ये राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाने केलेल्या देशव्यापी सर्वेक्षणांबद्दल सामान्य जनतेमध्ये जागरूकता निर्माण केली जाणार आहे. या रॅलीचे उद्घाटन राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाचे उपमहासंचालक श्रीनिवास उप्पाला यांच्या हस्ते होईल. बाईक रॅली

दरम्यान, अधिकारी आणि कर्मचाऱ्यांकडून पोस्टर, बॅनर आणि घोषणांच्या माध्यमातून जागरूकता निर्माण करण्याचा प्रयत्न केला जाईल.

-----------------------------------

मोसमी पाऊस तयारी

पावसाळ्यात जीवीत आणि मालमत्तेची हानी रोखण्यासाठी राज्यातल्या सर्व प्रशासकीय अधिकाऱ्यांनी सुटीच्या दिवसांसह २४ तास सज्ज राहण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. ते मोसमी पावासाच्या पूर्वतयारीच्या आढावा बैठकीत बोलत होते. आपत्तीच्या वेळी तात्काळ प्रतिसाद देणे महत्वाचे आहे. त्यासाठीची कार्यपद्धती योग्यरित्या राबवावी. पश्चिम महाराष्ट्रामध्ये यंदा अधिक पावसाचा अंदाज पाहता सांगली आणि कोल्हापूर महानगरपालिकांनी विशेष तयारी ठेवावी. दरड कोसळण्याच्या जागी तातडीने सुरक्षा उपाययोजना कराव्यात. यात जिल्हाधिकारी यांनी प्रामुख्याने लक्ष घालावे. मुंबईत दरड प्रवण अशी एकूण २४९ ठिकाणे आहेत. याबाबत सर्वच संबंधित यंत्रणांनी तातडीने उपाययोजना कराव्यात. असंही त्यांनी यावेळी सांगितलं.

-----------------------------------

नन्हे फरिश्ते

मध्य रेल्वेच्या ऑपरेशन नन्हे फरिश्ते अंतर्गत काल वर्धा रेल्वे स्थानकावर रेल्वे संरक्षण दलाच्या कर्मचाऱ्यांनी दक्षता आणि संवेदनशीलतेचा परिचय देत हरवलेल्या मुलीचा शोध घेतला. नियमित गस्तीदरम्यान बडनेरा स्टेशन जवळ ही मुलगी चिंतित असल्याचे आढळून आले. त्यानंतर या मुलीची वैद्यकीय तपासणी करून तिला चाईल्ड लाईनकडे सुपूर्द करण्यात आलं. कौटुंबिक वादानंतर मध्यप्रदेशमधून अनावधानाने वर्धा स्थानकावर पोहोचल्याची माहिती मिळाली आहे.

-----------------------------------

अजनी रेल्वे स्टेशन

मध्य रेल्वे नागपूर मंडळ तर्फे अजनी रेल्वे स्टेशनवर पुनर्विकासाचे कार्य जोमात सुरू असून त्यात उल्लेखनीय प्रगती बघायला मिळते आहे. यात रचना आणि बांधकाम विषयक कामं प्रगतीपथावर असून दक्षिणेकडील फुट ओवर ब्रिजचे काम यशस्वीरित्या पूर्ण झाले आहे. याशिवाय अंतर्गत आणि बाह्य बांधकामाच्या कामा-व्यतिरिक्त फलाटाची कामे देखील पूर्ण करण्यात येत आहे

-----------------------------------

हवामान

आज, उद्या आणि परवा संपूर्ण विदर्भात वादळी पर्जन्यमानाचा येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. यादरम्यान विजांच्या कडकडाट्यासह सोसाट्याचा वारा आणि हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता नागपूरच्या प्रादेशिक हवामान विभागाने वर्तवली आहे. दरम्यान विदर्भात आज सर्वाधिक कमाल तापमान नागपूर इथं 41. 2 अंश सेल्सिअस इतकं नोंदवण्यात आलं.

-----------------------------------

परिवहन विभाग

परिवहन विभागाच्या राज्यभरात असलेल्या ४३ जागांपैकी मुंबईतील ४ मोक्याच्या जागा अनाधिकृत रित्या बळकावण्यात आल्या आहेत. तसेच १५ ठिकाणी परिवहन कार्यालय ही भाड्याच्या जागेत आहेत. अशा परिस्थितीमध्ये भविष्यात उर्वरित जागा देखील गिळंकृत होऊ नयेत यासाठी परिवहन विभागाने या जागांचा विकास करण्यासाठी प्रयत्न करावेत. असे निर्देश परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिले. ते परिवहन विभागाच्या आढावा बैठकीत बोलत होते. २० जून पर्यंत जमिनी विषयक सर्व कागदपत्रे तपासून त्याचे प्रमाणीकरण करण्यात यावे, जेणेकरून या जमिनीच्या विकासा संदर्भात अंतिम निर्णय घेता येईल असेही ते म्हणाले.

-----------------------------------

सुधारित वेळापत्रक

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालयातर्फे शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी अकरावीच्या ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेचं प्रवेश फेरी १ चे सुधारित वेळापत्रक आज, दुपारी तीन वाजता जाहीर केलं जाणार आहे. प्रवेशासाठी अंतिम अर्ज २८ मे पर्यंत भरता येतील. विद्यार्थी कमीतकमी एक आणि जास्तीत जास्त १० महाविद्यालयांच्या नावाचा पसंतीक्रम देऊ शकतात.

-----------------------------------

आयपीएल क्रिकेट

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत मुंबई इंडियन्स संघानं बाद फेरीतलं स्थान मिळवलं आहे. मुंबईच्या वानखेडे मैदानावर काल झालेल्या सामन्यात मुंबई इंडियन्स संघानं दिल्ली कॅपिटल्स संघावर ५९ धावांनी विजय मिळवला. प्रथम फलंदाजी करताना मुंबईच्या संघानं २० षटकांत १८० धावा केल्या. दिल्ली संघाचा डाव १८ षटकं आणि २ चेंडूत १२१ धावांवर आटोपला.आज अहमदाबाद इथं गुजरात टायटन्स

**आणि लखनऊ सुपर जायंटस् यांच्यात सामना होणार आहे. खेळ संध्याकाळी साडेसात वाजता सुरु होईल.**

**------------------------------------**